ESTD 1962
NAAC "A" GRADE

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

संदर्भ : वित्त मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली यांचे परिपत्रक क्रमांक F.No. 275/192 /2018-IT (B) दिनांक 01 जानेवारी, 2019.

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, आयकर नियम 1961 मधील कलम 192 प्रमाणे संपूर्ण वर्षामध्ये मिळणा-या वेतन व इतर भत्त्यांची रक्कम करमुक्त मर्यादेहून जास्त असेल तर वेतन आदा करण्या-या अधिका-यावर पगार आदा करताना कपात करण्याची जबाबदारी असते. यासंदर्भात आयकर कार्यालयास मासिक, त्रैमासिक व वार्षिक अहवालामध्ये प्रत्यक्षात आदा केलेले वेतन व त्या वेतनातून करमुक्त असलेल्या वजावटी यांची माहिती विहित प्रपत्राद्वारे दिली जाते.

विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांनी सन 2018-19 या आर्थिक वर्षामधील आपले अपेक्षित उत्पन्न व आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली / येणारी रक्कम या संदर्भातील तपशीलवार माहिती देवून अंदाजे करपात्र उत्पन्न व भरावा लागणारा आयकर/अधिभार याचे स्वनिर्धारण करून त्या बाबतची माहिती पगारपत्रके विभागास सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार काही सेवकांनी सदरची माहिती सादर केली आहे.

त्यानुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक/प्रशासकीय सेवक यांना कळविण्यात येते की, सध्या ज्या ज्या शिक्षक/प्रशासकीय सेवक यांनी आयकर गणना करणेसाठी त्यांची दिलेली माहिती दरमहाच्या वेतनप्रणालीत घेवून त्यानुसार आयकर आकारण्यात येत आहे. याबाबत काही दुरूस्ती असल्यास दिनांक 20 फेब्रुवारी, 2019 पर्यंत पगार पत्रके विभागात समक्ष येवून गुंतवणूक कागदपत्रांची पूर्तता करावी अन्यथा **आयकर कमी पडणारी रक्कम आपल्या फेब्रुवारी 2019 च्या वेतनातून कपात केली जाईल व कपात केलेली रक्कम आयकर नियमानुसार शासनास भरणा केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.**

वित्त व लेखाधिकारी

शिवाजीविद्या./पगारपत्रके/डि.वाय/आयकर2018-19/241
दिनांक- 07 फेब्रुवारी, 2019

टिप : सर्व अधिविभागप्रमुख तसेच सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्वांच्या निदर्शनास आणावे.

C:\Users\admin\Desktop\Dhairyasheel\IT REPORT MONTHLY\circular.docx

Scanned by CamScanner